# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : diplomadesk10dte@gamil.com Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


<u>कालमर्यादित</u>

दि. 17.04.2015

जा.क्र.10/एनजीपी/विद्यार्थी गणवेष/2015/ २००

दिनांक : 8 APR 2015

प्रति,
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, पुणे, मुंबई.

विषय- तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या संस्थामधील विद्यार्थ्यांना गणवेश सक्ती करणेबाबत. .

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण महाविद्यालयातील/संस्था मधील पदवी/पदविका अभ्यासक्रमांतील प्रवेशित विद्यार्थ्यांना गणवेशाची सक्ती करण्याबाबत कोणतेही निर्देश या तंत्रशिक्षण संचालनालयाचे स्तरावरुन देण्यात आलेले नाहीत. तथापी काही संस्थामधील विद्यार्थांना गणवेश परिधान करण्याची सक्ती संस्थामधुन करण्यात येते असे निवेदन प्राप्त झालेले आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी खालील मुद्याबाबतचा खुलासा आपले विभागांतर्गत संस्थाचे प्राचार्य/संचालक यांचेकडुन घेण्यात यावा.

1. पदवी/ पदविका अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थ्यांना गणवेश परिधान करण्याचे सक्तीचे करण्यात आले आहे काय?
2. विद्यार्थ्यांना गणवेश परिधान करण्याची सक्ती केली असल्यास असे करण्यामागील संस्थेची/ महाविद्यालयाची भुमिका काय आहे ?
3. गणवेश परिधान करण्याबाबत संस्था/महाविद्यालय /विभागीय कार्यालयाचे स्तरावर विद्यार्थ्यांकडुन काही तक्रारी /निवेदने प्राप्त झाली आहेत काय? असल्यास त्याबाबतच्या स्वरुपासह तपशिल द्यावा.
4. विद्यार्थ्यांना गणवेश विशिष्ट दुकानातून अथवा संस्थेच्या सहकारी भांडारातूनच खरेदी अनिवार्य करण्यात येते किंवा कसे ?
5. विद्यापीठ /तंत्रशिक्षण मंडळाकडुन या संदर्भात काही निर्देश देण्यात आलेले आहेत किंवा कसे ?

वर नमुद मुद्यांबाबतची माहीती आपले विभागांतर्गत संस्था/महाविद्यालयांकडुन तात्काळ उपलब्ध करुन घेऊन अहवाल दि. 17.04.2015 पर्यंत संचालनालयास पाठविण्यात यावा.

( दयानंद मेश्राम )
सहसंचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

---

<u>कालमर्यादित</u>

दिनांक:— १६/०४/२०१५.

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर.
क्र :—तंशिसं/विकाना/पदविका/विद्यार्थी गणवेष/२०१५/1078
दि. 10 APR 2015

प्रति,
प्राचार्य,
सर्व पदवी /पदविका संस्था,
नागपूर विभाग , नागपूर.

त्यांना कळविण्यांत येते की, पत्रात नमूद केलेल्या मुद्याबाबतचा माहिती या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर.